# मुक्या संस्कृतीला वाचा

कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)
**सुधीर अनवले**, उदगीर

समाजकार्य हा व्यवसाय बनत चालला असल्याच्या काळात सुधीर रामदासराव अनवले नावाच्या एका तरुणाने बदलाची सुरुवात स्वत:पासून केलेली आहे. स्वत:ला त्याने आज भटक्या-विमुक्तांच्या चळवळीत बांधिलकीच्या भावाने झोकून दिलं आहे. 'उपरा' कार लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यात कार्यकर्ता म्हणून काम करताना एके काळी त्याने भटक्या-विमुक्तांची शोधयात्रा काढलेल्या पालखीला खांदाही दिला होता. स्वभावातच बंडखोरी असलेला सुधीर नंतर मात्र कोणत्याही झाडाखाली थांबला नाही. झाडाखाली झाड वाढत नसतं, म्हणून मग त्याने स्वत:चं आभाळ स्वत:च शोधलं आणि २००४मध्ये भटक्या-विमुक्तांच्या चळवळीत स्वतंत्रपणे काम करण्यासाठी 'भारतीय भटक्या-विमुक्त जमाती विकास संघटना' स्थापन करून आपल्या पावलांचे ठसे सामाजिक चळवळींच्या नकाशावर रोवण्यास प्रारंभ केला.



आज लातूर, उस्मानाबाद, नांदेड, बीड, हिंगोली, परभणी, सोलापूर, बुलडाणा, गडचिरोली, औरंगाबाद, जालना, चंद्रपूर, नाशिक, अहमदनगर, वर्धा, अकोला, नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यांतील ९८ तालुक्यांमध्ये या संघटनेच्या कार्याचं जाळं पसरलं आहे. भटक्या-विमुक्तांच्या पालावर कुठं अन्याय दिसलाच, तर सुधीर लगेच तडकून उठतो. भटक्या-विमुक्त समाजात बदल करण्यासाठी 'वासुदेव' समाजातील या वासुदेवाचा अखंड जागर सुरू आहे. तो करताना त्याला सततच संघर्षाचा सामना करावा लागला, पण तो कधी डगमगला नाही. त्याच्या मनाला 'फंडिंग' चा विचार कधी शिवला नाही. समाजकार्यासाठी सरकारी मदत वा विदेशी निधी मागण्याच्या आणि चळवळीशी द्रोह करण्याच्या मोहानेही त्याला कधी खुणावलं नाही. संस्थेतून आपलाही उदरनिर्वाह चालावा, आपल्या पोराबाळांचं भलं करावं, परदेशवाऱ्या घडाव्यात अशी भावना बऱ्याच धंदेवाईक सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये अलीकडं दिसू लागली आहे. तिचा लवलेशही सुधीरमध्ये नाही. चळवळीशी बेइमानी करायची मांडवली त्याने कधीच केली नाही.

भटक्या-विमुक्तांचे अनेक प्रश्न सध्या धगधगते आहेत. त्यासाठी अनेक मोर्चे व उपोषणांचं हत्यार या लढवय्या तरुणाने उपसलेत. भटक्या-विमुक्त जमातीतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांतील अस्वस्थता हेरून त्याने त्यांची 'सुशिक्षित बेरोजगार परिषद' आयोजित केली होती. अनेक विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी २००२ साली एल्गार पुकारला होता. चळवळी बळकट करायच्या, तर कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिलं पाहिजे, हा कळीचा मुद्दा लक्षात आल्यानंतर त्याने लातूरला राज्यपातळीवर व मराठवाडा स्तरावरही 'कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरां'चे सातत्याने आयोजन केलं. २०१०मध्ये भटक्या-विमुक्तांची 'भाकरी परिषद' आयोजित केली होती. या परिषदेला असलेल्या जवळपास ५ हजार भटक्या-विमुक्तांच्या उपस्थितीमुळं महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींचं लक्ष या



तरुणाने वेधून घेतलं होतं.

या चळवळीला वैचारिक अधिष्ठान देण्यासाठी गेल्या २० वर्षांपासून सुधीर फुले-आंबेडकरांच्या विचारांवर परिसंवाद व चर्चासत्रांचं आयोजन करतो आहे. भटक्या-विमुक्तांमधील अंधश्रद्धा व रूढी-परंपरांच्या निर्मूलनासाठी त्याची महाराष्ट्रभर भटकंती आजही चालूच आहे. जातपंचायतींचा प्रभाव कमी व्हावा किंबहुना या प्रथेचं निर्मूलनच व्हावं यासाठी सुधीरने केलेल्या प्रयत्नांची दखल घ्यावी लागेल. फुले- आंबेडकरी विचारांचा कट्टर पुरस्कर्ता म्हणून राज्यातील अनेक प्रतिष्ठित व्याख्यानमालांमधून त्याने पुरोगामी चळवळीची वैचारिक मांडणी केली आहे. या सक्रीय चळवळीतील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र यांच्या वतीने सुधीरला २०१७मध्ये राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार देऊन ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या हस्ते गौरवण्यात आलं होतं.

तशा सुधीरच्या अंगी नाना कळा आहेत. औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात सतत ४ वर्षं तबलावादनातील सुवर्ण पदक, अ.भा. युवक महोत्सवात तबलावादनातील तिसरा पुरस्कार, संगीतकार शंकर-जयकिशन व राम कदम यांच्यासोबत कार्यक्रमात सहभाग ही त्याची काही उदाहरणं. 'मुप्टा' संघटनेचा बीड इथे २०१७ मध्ये देण्यात आलेला राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आणि असेच काही अन्य पुरस्कार त्याच्या शिरपेचात आहेत.

चळवळीचा धांडोळा घेणारा 'भटक्या-विमुक्तांची चळवळ : स्वरूप व व्यवहार' हा ग्रंथ आणि 'भटक्या-विमुक्त चळवळीच्या कविता' हा त्याचा काव्यसंग्रह आता प्रकाशनाच्या वाटेवर आहे. शिवाय 'लोकमत', 'सकाळ', 'एकमत' आदी वृत्तपत्रांतून व राज्यातील अनेक नियतकालिकांमधून भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांवर सुधीरचे अनेक लेखही प्रकाशित झालेले आहेत.



प्रत्येक संस्कृती, मानवाच्या सामाजिक इतिहासाची प्रत्येक अवस्था आपल्यासोबत काही संकटं आणि आव्हानं घेऊन येत असते. हे सामाजिक तुटलेपण पाहून आपण सारे भिऊन गेलो आहोत. असहिष्णुतेचा अमानवी चेहरा आपल्याला सतत भयग्रस्त ठेवतो आहे. या भयग्रस्ततेच्या अंगजाळ उन्हात अनेक शोषित आणि वंचित होरपळून जात आहेत. या पार्श्वभूमीवर अदम्य जिद्दीने सुधीर न थकता लोकलढे लढतो आहे. त्यांना आपल्या परीने बळ देतो आहे. त्याने त्यासाठी कित्येकदा प्रशासनाच्या आणि प्रस्थापितांच्या अभेद्य भिंतींना धडका दिल्यात. निरपेक्ष वृत्ती ठेवून, मोडून पडलेल्या माणसांचे संसार उभे केले आहेत. मात्र हे करताना आपली वैचारिक आयुधं त्याने शाबूत ठेवली आहेत. त्यामुळे सुधीर अनवले कधी या आयुधावाचून दिसलाच नाही. भटक्या-विमुक्तांना त्यांचं हरवलेलं आभाळ शोधून देणारा एक संवेदनशील आणि तरीही पोलादासारखी दुर्दम्य जिद्द असणारा सुधीर त्यांच्या मुक्या संस्कृतीला वाचा देण्याचा अथक प्रयत्न आयुष्यभर करतो आहे. रस्त्यावर उतरून तो त्यांची लढाई बुलंद करतो आहे. भटक्या विमुक्तांच्या चळवळीचा अहोरात्र जागर करणारा हा 'वासुदेव' जागल्या बनून मराठवाड्यात भक्कमपणे उभा आहे. या लोकपीठाचा तो आजीव सदस्यच आहे.

*'फार झाली वादळांची ही चढाई,*
*जिंकण्यासाठीच माझी ही लढाई'*

असं म्हणणाऱ्या सुधीरने पोटात ओरडणाऱ्या कावळ्यांचा धम्म बरोब्बर ओळखला. जगण्याचं वेगळं तत्त्वज्ञान मग तो सांगत बसला नाही. गजानन माधव मुक्तिबोधांची 'चकमकीच्या ठिणग्या' नावाची एक कविता आठवते. तीत एक ओळ आहे - 'आता तर ब्रम्हराक्षसांच्या सावल्या गांधीजींच्या चपला घालून फिरत आहेत...' सभोवार असं विषाक्त वातावरण असतानाही सुधीरने हातातली मशाल कधी खाली ठेवलेली स्मरत नाही. सामाजिक चळवळींच्या कष्टप्रद अध्यायाचा तो प्रतिनिधी आहे. भटक्यांचं बेघर जगणं त्याने वाचलं आणि त्या जगण्याला शब्द देऊन त्याने त्यांचा जागर मुखर केला. वंचितांच्या लढाया दाखवून आमदारकी वा शिक्षणसंस्था पदरात पाडून घेण्याचा मोह त्याला कधी झाला नाही.

भटक्या-विमुक्तांमधील अंधश्रद्धा संपून त्यांच्यात विज्ञानवादी दृष्टिकोन रुजावा यासाठी चर्चासत्रं, भटक्या-विमुक्तांचं साहित्य संमेलन, भटक्या-विमुक्तांच्या हस्तोद्योग व पारंपरिक व्यवसायातून निर्माण केलेल्या वस्तूंसाठी बाजारपेठ असे सुधीरचे अनेक संकल्प आहेत. या सर्व गोष्टींसाठी, लढ्यांसाठी त्याच्या हातांना बळ देणं एवढं तरी आपण करणार आहोत की नाही?

– जयप्रकाश दगडे
9422470518